Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldgrt.lbp.world**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016



Golden Research Thoughts

GRT

# ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट : एक सामाजिक आर्थिक आढावा

भालेराव वैभव दिलिप
तृतीय वर्ष कला , इतिहास विभाग.
मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे.

**प्रस्तावना : –**

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती या संस्थेची स्थापना 22 जून 1971 रोजी झाली. त्यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. शरदचंद्रजी पवार यांनी सदस्य श्री. गुलावराव वाबळे, श्री. धवण पाटील व दोन ऑस्ट्रेलियन महिला एडना वजहर व हॅजेल स्क्वी यांच्या साहाय्याने केली.

सन 1972 साली श्री. रघुनाथ गावडे, पुष्यसेन गोरे, हरीभाऊ वाघमोडे संस्थेच्या कामकाजास धावून आले.

**संस्था स्थापनेची पार्श्वभूमी : –**

बारामती पुणे जिल्ह्यापासून 100 किमी पासून अंतरावर वसलेला एक तालुका तस पाहता बारामतीकरांना शेतीसाठी पावसावरच अवलंबून रहावे लागत होते. बारामतीचा 1/3 भाग ओलीताखाली होतो तर 2/3 भाग कोरडा होता. यासाठी काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे होते. तेव्हा सामान्य कुटुंबातील एक योग पुढे आला. आणि त्याने आपल्या समवेत माणसे गोळा करण्यास सुरूवात केली ते व्यक्तिमत्व म्हणजे देशाचे माजी कृषिमंत्री श्री. शरदचंद्रजी पवारसो त्यांना पावसाच पाणी शेतात जिरवणे त्या पाण्याचा वापर शेतीसाठी करणे तसेच या कामात त्यांना ऑस्ट्रेलियन महिलेची मदत झाली.



**संस्थेच्या कार्याचे टप्पे : –**

**1.पाझर तलावाचे बांधणी –**

शेतीसाठी योग्य पाण्याचा वापर करण्यासाठी फूड फॉर वर्क या योजनेद्वारे मोठ्या प्रमाणात बारामती क्षेत्रात पाझर तलावाचे बांधणी करण्यात आले. त्यामुळे धान्य उत्पादनात मोठी क्रांती झाली. या कामात शेतकरी व सामान्य जनतेचा सहभाग होता.

**2.संस्थेचे नेतृत्व अप्पासाहेब पवार –**

1975 साली संस्थेचे नेतृत्व मा. अप्पासाहेब पवार यांच्याकडे आली. त्यांनी सर्वसामान्य लोकमाणसामध्ये कृषी क्षेत्रातील नविन तंत्रज्ञानाचा प्रचार व रूजवणूक करण्यास सुरूवात केली. त्याचा सर्वात महत्वाचा म्हणजे 1982 साली इस्त्राईल या देशातून सर्वात प्रथम ठिबक सिंचनाचा वापर आपल्या देशात केला गेला.

**3.संस्थेचे कार्य –**

शेतकऱ्यांना थेट अनुभव देण्यासाठी संस्थेने विविध उपक्रमांचे आयोजन केले. त्यात देश विदेश अभ्यासदौरे, शिवारफेऱ्या, प्रशिक्षण वर्ग, कार्यशाळा इ. आयोजन केले

**अ) शैक्षणिक संकूल –** संस्थेच्या कार्यक्षेत्रातील मुलामुलींना शिक्षणाच्या विविध सुवर्णसंधी प्राप्त होण्यासाठी शारदानगर येथे शैक्षणिक संकूलाची उभारणी 1991 साली केली.

ब) कृषी विज्ञान केंद्राची स्थापना ICAR तर्फे जुलै 1992 मध्ये कृषि विज्ञान केंद्राची स्थापना संस्थेच्या आवरात केले गेले. 120 एकराच्या

परिसरामध्ये शेतकऱ्यांना उपयुक्त अनेक संशोधन प्रकल्प व पद्धती यांचा समावेश यात केला गेला. तसेच आर्थिक स्तर उंचवण्यासाठी दुध उत्पादन, कुक्कटपालन, रेशीम निर्मिती व प्रशिक्षण अत्याधुनिक तंत्रज्ञान व विविध आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रकल्पांची अंमलबजावणी या केंद्रात केली गेली जाते.

### क) संस्थेचे विविध उपक्रम –

अ) परिवर्तन व्याख्यानमाला
ब) भिमथडी जत्रा
क) शारदा महिला संघ
ड) सृजन
इ) चैत्रपालवी
ई) विविध संस्थापातळीवरील उपक्रम

### ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट : बारामती

कोणतीही संस्था नावारूपाला येते ती संस्थेतील माणसांमुळं. संस्था जे मूल्य जोपासते, तेच मूल्य तेथे काम करणाऱ्या, शिकणाऱ्या व्यक्तींमध्ये पाझरत असते. अशाच व्यक्तींमधून संस्थेनं जोपासलेल्या मूल्यव्यवस्थेचं दर्शन होतं असतं. ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, येथील शारदा संकुलात आज अनेक तरूणंनी आपलं आयुष्य घडवलंय. आज वंचित घटकातील  अनेक मुली संघर्ष करू पाहतायेत. त्यांच्या संघर्षाला साथ देण्याचं काम संस्थेच्या विविध उपक्रमातून चालतं. आज या मुलींच्या आयुष्यातील संघर्ष कमी करण्याचं, त्यांच्या स्वप्नांना उभारी देण्याचं काम संस्थेच्या विविध उपक्रमातून चालतं.




### 4. कृषिक

शेतीविषयक औत्युक्य, जिज्ञासा, नाविन्य, आधुनिकता, तंत्रज्ञान आणि समाधान या सर्वांचा उत्कृष्ट कृषिक मध्ये ताळमेळ साधला जातोय. येणारी प्रत्येक व्यक्ती मग ती शेतकरी असो वा विद्यार्थी, महिला, व्यावसायिक, सहभागी कंपन्या किंवा विविध देशातून आलेले परदेशी प्रेक्षक असो, प्रत्येक जण चेहऱ्यावर एक अतोनात समाधान आणि भीमथडी जत्रेतील पदार्थांची रेंगाळणारी चव घेवून तिसऱ्या दिवशीही न थकता परततत होता.




शेती म्हणजे नक्की काय ते शेतीतील अवघडीतील अवघड समस्या तंत्रज्ञानाच्या मदतीने कशा सोडविता येतील या आणि अशा अनेक शंकांवर समाधानकारक तोडगे कृषिक मध्ये सहभागी होणाऱ्या हजारोंहून अधिक शेतकरी बांधवांना देता येते.

या प्रदर्शनामध्ये पीक प्रात्यक्षिके, शेतीतील यांत्रिकीकरण – मशीनरी प्रात्यिक्षिके, मातीविना शेती, नवीन कृषी तंत्रज्ञान, पशु–पक्षी प्रदर्शन, डेअरी व्यवस्थापन, आधुनिक लागवड तंत्रज्ञान, स्वयंचलित खत व पाणी यंत्रणा इ. प्रकारचे तंत्रज्ञान हे या वर्षीच्या कृषिक चे आकर्षण असणार आहे.

कृषिक 2017   या भारतातील सर्वात मोठया प्रात्यक्षिकेयुक्त कृषी व पशुपक्षी प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राच्या 110 एकरावरील शेती फार्म वर नेदरलॅडच्या व्हॅन हॉल लारेनन्स्टाईन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हॅरी ओनकेन यांच्या हस्ते नेदरलॅड दूताावासातील कृषी सल्लागार डॉ. वावटर हॅरी, संस्थेचे अध्यक्ष मा. शरद पवार राज्याचे कृषीमंत्री पांडुरंग फुंडकर, राज्यमंत्री सदाभाऊ खोत, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विश्वनाथा संस्थंचे चेअरमन मा. राजेंद्र पवार यांच्या उपस्थित पार पडले. परदेशी संस्थेच्या करारातून बारामतीत शेतीच्या विकासात केले जात असलेले काम म्हणजे महाराष्ट्राच्या शेतीत नवी क्रांती आहे. कृषी क्षेत्रातील हे आगळेवेगळे प्रदर्शन आहे. शेतीच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना समजून सांगण्याची पद्धत येथेही

अवलंबली. या प्रदर्शनात थेट बांधावर संबंधित बियाणे, औषधे, वाण लागवडीच्या माध्यमातून दाखवून दिली आहे. महाराष्ट्रातील इतर केव्हीके आणि कृषी विद्यापीठांनी येथे चाललेल्या कामाचा आदर्श घ्यावा असे हे काम आहे. सध्याच्या स्थितीत अधिक उत्पादन, उत्पादन खर्च कमी व गुणवत्ता असलेल्या पीक पद्धतीची आवश्यकता आहे. ते काम बारामतीत ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट करते आहे याचे कौतुक आहे, असे मत कृषीमंत्री पांडुरंग फुंडकर यांनी येथील कृषिक प्रदर्शनाच्या पाहणीनंतर केले. राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनीही महाराष्ट्रात मी पाहिलेले आगळेवेगळे कृषी प्रदर्शन व शेती आणि शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासासाठी केलेली धडपड अशा शब्दात कृषिक प्रदर्शनाचे कौतुक केले ¬ कृषिक च्या औपचारिक उद्‌घटनानंतर त्यांनी 110 एकरातील शेतीच्या विविध प्रात्यक्षिकांचे, मधमाशीपालन प्रकल्प, मत्स्य प्रकल्प, पशुपक्षी प्रदर्शन, यांत्रिकी कक्ष तसेच भिमथडी जत्रेची पाहणी केली.

***4.1 कृषिक –*** कृषी प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्यात – पहिल्या वर्षीच्या यशस्वी आयोजानंतर यावर्षी दि. 19 ते 22 जानेवारी 2017 या दरम्यान शेतकरी बांधवांसाठी दुसऱ्या कृषिक 'प्रात्यक्षिकेयुक्त कृषी प्रदर्शनाचे' ॲग्रीकल्चरल डेव्हलमेंट ट्रस्ट बारामती च्या कृषी विज्ञान केंद्रातील 110 एकार शेती फार्मवर होणाऱ्या भव्य कृषी प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. या प्रदर्शनामध्ये पीक प्रात्यक्षिके, शेतातील यांत्रिकीकरण – मशीनरी प्रात्यक्षिके, मातीविना शेती, नवीन कृषी तंत्रज्ञान, पशु–पक्षी प्रदर्शन डेअरी व्यवस्थापन, आधुनिक लागवड तंत्रज्ञान, स्वयंचलित खत व पाणी यंत्रणा इ. प्रकारचे तंत्रज्ञान हे या वर्षीच्या कृषिक चे आकर्षण असणार आहे.

4.2 आधुनिक शेती व तंत्रज्ञानाची माहिती बांधावरच घेऊन शेतीतील नवनव्या संधीचा अभ्यास करीत लाखो तरूण शेतकऱ्यांसह वयोवृद्ध तसंच महिला शेतकऱ्यांनी भेट देत ॲग्रीकल्चरल डेव्हलमेंट ट्रस्ट बारामती संचलित कृषी विज्ञान केंद्र आयोजित दुसऱ्या कृषिक प्रदर्शनाची यशस्वी सांगता झाली. दि. 19 ते 22 जानेवारी दरम्यान संस्थेच्या 110 एकरावरील शेती फार्मवर झालेल्या भारतातली या सर्वात मोठया प्रात्यक्षिकेयुक्त कृषी व पशुपक्षी प्रदर्शनामध्ये महाराष्ट्रामध्ये इतर राज्यातील व जगातील वेगवेगळया देशातील शेतकऱ्यांनी उपस्थिती लावून हे प्रदर्शन यशस्वी केले. या प्रदर्शनामध्ये शेतीतील तंत्रज्ञान व त्याचे प्रात्यक्षिक थेट बांधावरच मिळत असल्याने शेतकऱ्यांनी अतिशय उत्सुकतेने आपल्या मनातील सर्व प्रश्नांना मोकळीक करून दिली. लाखोंच्या संख्येने शेतकऱ्यांच्या भेटी तरीही नेटक्या नियोजनामुळे प्रदर्शनामध्ये अतिशय शिस्तबद्धता, परदेशी विद्यार्थ्यांनी दिलेली भेट, प्लस्टिक मुक्त परिसर, पशुपक्षी दालनाला मिळालेला प्रतिसाद, डेअरी फार्म मधील नवनवीन तंत्रज्ञान, वेगवेगळया जातीचे मासे व त्यांची माहिती, सर्व प्रकारच्या भाजीपाला व पिकांची माहिती, भिमथडी जत्रेतील गावरान पदार्थाची मेजवानी ही या वर्षीच्या कृषिकचे वैशिष्ट्ये ठरली.

4.3 जगभरातल्या संस्थांसोबतच्या करारातून बारामतीच्या शेतीमध्ये केले जात असलेले प्रयोग म्हणजे महाराष्ट्राच्या शेतीत होणारी नवी क्रांतीच आहे. कृषिक हे कृषी क्षेत्रातील असे आगळेवेगळे प्रदर्शन आहे, जिथे शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना समजावून सांगण्याची पद्धत अवलंबली जाते. म्हणूनच हे प्रदर्शन भारतातल्या शेतकऱ्यांसोबत जगभरातल्या शेतकऱ्यांच्यादेखील औत्सुक्याचा विषय ठरते. कृषिकचा होच अनुभव घेण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील नेदरलॅन्डस, स्पेन, इंडोनेशिया मधून आलेल्या शेतकऱ्यांनी आणि शेती संशोधकांनी कृषिक–2017 मध्ये हजेरी लावली.

### *5.शरद मल्हार*

हा लहान मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी पुणे जिल्ह्यात आयोजित केला जाणारा मेळावा आहे. यामध्ये संस्थेतील मुले अविरत सराव करून सहभागी होतात व कायम वरच्या श्रेणीतील बक्षिसे पटकवितात.




### *6.चला समृद्ध गाव घडवूया*

नवनिर्वाचित सदस्यांना गावचा विकास व कारभार करताना नवनवीन योंजनांची माहिती मिळावी, शासकीय योजना कळव्यात, आपापसात समन्वय साधला जावा, गावातील घंटे कमी होऊन गावाचा विकास व्हावा, निर्मल ग्राम, जलसंधारण, ड्रेनेज व्यवस्था इ. संदर्भात माहिती मिळावी या हेतूने Agricultural Dev, Trust Baramati. ने दौंड, इंदापूर, बारामती व पुरंदर या तालुक्यातील सरपंच,

ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांची निवासी कार्यशाळा दिरोजी शारदानगर येथे आयोजित केली 2015.11.20 ते 2015.11.18 होती.




6.1 'चला समृद्ध गाव घडवूया' – नवनिर्वाचित सदस्यांना गावचा विकास व कारभार करताना नवनवीन योजनांची माहिती मिळवी, शासकीय योजना कळव्यात, आपापसात समन्वय साधला जावा, गावातील तंटे कमी होऊन गावाचा विकास व्हावा, निर्मल ग्राम, जलसंधारण, ड्रेनेज व्यवस्था इ. संदर्भात माहिती मिळावी या हेतूने ।हतपबनसजनतंस क्मअए ज्तनेज ठंतंउंजपण ने दौंड, इंदापूर, बारामती व पुरंदर या तालुक्यातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक यांची निवासी कार्यशाळा दि. 2015.11.20 ते 2015.11.18 रोजी शारदानगर येथे आयोजित केली होती.



6.2 वतीने 'चला समृद्ध गाव घडवूया' या अभियानांतर्गत बारामती, इंदापूर, दौड, पुरंदर तालुक्यातील विविध गावातील सरपंच, उपसरपंच पदाधिकाऱ्यांनी धरणागुत्ती तालुकाशिरोळ जिल्हा–कोल्हापूर गावास भेट देऊन येथे राबविलेल्या विविध उपक्रमांना आणि विकास कामांचा आढावा घेतला.



6.3 ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती व रोटरी क्लब बारामती यांच्या संयुक्त विदयमाने विविध बचत गटातील गरजू महिलांना मोफत शिलाई मशिनचे वाटप व कृषी पणन मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह सोसायटी विभाग शारदानगर यांच्याकडून चार बचत गटांना व्यवसाय करण्यासाठी कर्ज पुरवठा संस्थेच्या विश्वस्त मा. सुनंदा पवार यांचे उपस्थित करण्यात आले.



## 7.जागतिक मृदा दिन

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या कृषी ज्ञिज्ञन केंद्रामार्फत 5 डिसेंबर हा जागतिक मृदा दिन साजरा करण्यात आला. थायलंडचे राज भूमिबोल अडुल्यादेज यांनी थायलंडमध्ये मृदा संधारणासाठी विशेष प्रयत्न केले होते व त्यांचे आठवणीमध्ये हा दिवस जागतिक मृदादिन म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमास 910 शेतकरी सहभागी उपस्थित होत व सुमारे 11060 शेतकऱ्यांना यावेळी मृदा आरोग्य पत्रिका वाटण्यात आली.या प्रसंगी माझेसह तालुका कृषि अधिकारी श्री. संतोषकुमार बरकडे, कृषि विभागाचे तंत्र अधिकारी श्री. एन.एस.शिंदे NIAM हच संचालक डॉ. नरेंद्र प्रतापसिंह वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. के.के. कृष्णजी, पाडेगावचे ऊस विशेषज्ञ डॉ. पवार आदि उपस्थित होते.

शेतकऱ्यांसाठी जमीन ही त्याची आई असते व तिची काळजी घेणे हे त्याच्यासाठी सर्वार्थाने गरजेचे आहे. शरीरात उद्भवणाऱ्या व्याधींवरील उपचारासाठी आपल्या शरीरामधील रक्ताची जशी आपण वेळोवेळी तपासणी करतो तशीच जमिनीचीही तिच्या सुदृढ आरोग्यासाठी तपासणी होणे गरजेचे आहे. मातीची योग्य तपासणीकरून त्यातील भौतिक, रासायनिक व जैविक घटकांचे संरक्षण करून त्या गुणधर्माची जोपासना केल्यास जमिनीचे आरोग्य सुधारून चांगली पिके घेता येतात व त्यामुळे मोठया प्रामणात जमिनीसाठी लागणाऱ्या इतर खतांची आयात करणे वाचेल. वाजवीपेक्षा जास्त रासायनिक खते वापरल्याने पिकांमध्ये निचरा होणारे पाणी वाढून त्याचा दुष्परिणाम दिसून येतो त्यामुळे खताचे प्रमाण गरजेपुरते वापरणे आवश्यक आहे.

जमिनीचे आरोग्य हे भौतिक, रासायनिक आणि जैविक अशा तीनही गुणधर्मावरून घडत असते. काळानुसार त्यातील होणाऱ्या बदलांचा अभ्यास करून जमिनीच्या आरोग्यपत्रिकेवर त्याच्या वेळोवेळी घेतलेल्या नोंदी मुळे जमीन व्यवस्थापनाची कामे जास्त प्रभावीपणे करता येतात.

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामतीच्या कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर ने 18 ऑक्टोबर 2016 रोजी जयपूर,, राजस्थान येथील एसजीव्ही विद्यापीठासोबत ''कार्यानुभवासोबत शिक्षण पद्धती'' साठीचा विद्यार्थी अदलाबदलीचा करारनामा केला. संस्थेचा चेअरमन म्हणून मी व त्या विद्यापीठाचे अध्यक्ष म्हणून डॉ. सुनील शर्मा यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

या करारामुळे तेथील विद्यार्थ्यांना आपल्याकडे कृषी व संलग्न क्षेत्रातील विविध तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण, जैविक इंधने व इतर जैविक घटक यांची निर्मिती, ग्रीन हाउसेस मधील संरक्षित लागवड, दुग्धतंत्रज्ञान व दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती, पोल्ट्री व्यवस्थापन, माती व पाणी परीक्षण, शेती व्यवसाय व्यवस्थापन आदि प्रात्यक्षिके व कार्यानुभवावरील आधारित प्रशिक्षण अभ्यासक्रम संस्थेच्या फार्मवर प्रत्यक्षरित्या कामाचा अनुभव घेऊन पूर्ण करता येणार आहे.

कोणतेही शिक्षण हे केवळ पुस्तके वाचुन वा पाठांतर करून मिळत नसते तर त्याचा सखोल अभ्यास करून प्रत्यक्ष त्यात उतरून, अनुभव घेऊन केल्यास ते सहजगत्या समजते व त्यातील अनुभवामुळे शिक्षणानंतर त्याकडे व्यावसायिकदृष्ट्या पाहावयाचे झाल्यस फायदा होतो. हाच उद्देश लक्षात घेऊन संस्थेने या विद्यापीठासोबत करार करून आणखी एक यशस्वी पाऊल पुढे टाकले आहे याचा अभिमान वाटतो.

## 8-Coming Together for a Cause

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामतीच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची दखल Times व India ने घेतली असून Coming Together for a Cause या शीर्षकाखाली दि. च्या 2016.6.25. अंकांमध्ये संस्था राबवत असलेल्या सामाजिक उपक्रमांविषयी माहिती देण्यात आली आहेयामध्ये मुख्यतः दान अभियान, भीमथडी जत्रा, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी मोफत कर्मवीर शिक्षण योजना, समृद्ध गाव घडवूया अभियान, परिवर्तन व्याख्यानमाला, मोफत महिला पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण, आरोग्य शिबीर, चैत्रपालवी इ. उपक्रमांचा उल्लेख सामाजिक करण्यात आलेला आहे.


8 PUNE TIMES, THE TIMES OF INDIA 25|6|2016 LIFESTYLE

## Coming together for a cause

Agricultural Development Trust, Baramati has been working relentlessly for social causes since 1967 and has had a positive influence on the lives of thousands every year, directly or indirectly. For the last four years, the trust has been working on a unique initiative, Vastradaan Abhiyaan, where clothes are donated to the needy. This year alone, more than 20,000 clothes have been donated so far to the residents of drought-affected villages in Latur and Beed. Apart from this, other necessary items, such as school uniforms, stationery, toys, shawls, etc, have also been donated.

Sunanda Pawar, trustee of the organisation, has undertaken several initiatives that have helped many. But the stupendous amount work hasn't ended here; they have also been providing free education to girls from economically-weaker sections of society under the Karmaveer scheme, where well-to-do people partly or fully sponsor educational expenses of girls from these economically-weaker sections.

The trust, with a strong social network, has been at the forefront, helping underprivileged villages. Sunanda says, "We receive immense support from generous people in various places, but for this year's clothes donation initiative in drought-effected areas, we got a great response from people in Pune, Mumbai, Kolhapur, Satara and Ahmednagar. I am grateful to them for helping our trust consistently and also welcome others wanting to be part of various initiatives."

Pawar paid a visit to the areas grappling with severe water shortage in the Marathwada region. Seeing the struggle of the farmers and farm workers in meeting their daily needs, the trust arranged to send relief material. "People have been generous in donating school uniforms, stationery, water bottles and day-to-day items to villages from Beed and Latur which are greatly affected by the water crisis. Within fifteen days, 20,000 old but good-condition clothes were collected and distributed. The trust aims at creating a bank of study material, stationery, books for children and competitive exams, toys, etc," adds Pawar. She believes there's immense satisfaction in serving people. This year, the trust worked on water conservation methods with farmers and completed around 15 km worth of work. She says, "The trust is just a medium for social work; real credit goes to the volunteers and people who work and contribute towards the cause. No one can serve everyone in need, but what matters is a genuine effort."

Other initiatives undertaken by the trust include Parivartan Vyakhyanmala; honouring women working in different fields. The trust has also given free training to rural women to join the police force, also undertaking health check-up camps, mainly treating over 300 women for vision correction. One of the most popular events organised by them, Chaitrapalavi, is an initiative dedicated to the farmers community, where annually, over 1500 visionary farmers from across the state come together to discuss problems in farming and understand new technologies. The trust organises for a traditional food, homemade items, art and craft fair called as Bhimthadi in Pune every year, which is well received by Punekars. This fair is one of the country's biggest platforms for womens' self-help groups to showcase their products.

*If you have passion to serve and genuinely want to work for those in need, contact: aditsharda@rediffmail.com, agricoltmt@gmail.com, or call: 9420155551 / 9021505229*

### *9.संस्थेतील इतर उपक्रम*

9.1 ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती संचलित स्पर्धा परीक्षा मंच शारदानगर यांच्यावतीने देशातील सर्वात तरूण IAS अधिकारी मा. अन्सार शेख यांची पुणे जिल्हयातील पहिली राज्यातील दुसरी ''एक दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा'' शारदानगर येथील अप्पासाहेब पवार सभागृहामध्ये पार पडली. संस्थेचे चेअरमन मा. राजेंद्रदादा पवार यांच्या हस्ते मा.अन्सार शेख यांचा सत्कार करून कार्यशाळा सुरूवात झाली. या कार्यशाळेत त्यांनी UPSC म्हणजे काय, नियमित परीक्षा व स्पर्धा परीक्षेतील फरक, या परीक्षेतील विविध घटक व उपघटकांचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी मुलाखती दरम्यान वारंवार विचारले जाणारे प्रश्न व बायोडाटा आधारित मुलाखतीचे तंत्र याचे सविस्तर विश्लेषण केले. या कार्यक्रमाला शारदानगर सह पुणे, सातारा, कोल्हापूर, अहमदनगर इ. जिल्ह्यातील 1500 पेक्षा जास्त विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.



9.2 ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानगर शैक्षणिक संकुलातीलमधील सर्व विभागातील विद्यार्थिनींसाठी संस्थेंच्या अप्पासाहेब पवार सभागृहामध्ये कॅन्सर बाबतचे डॉ. कसबेकर यांचे प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये त्यांनी कॅन्सर संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच या कार्यक्रमात मा. पदमिनी स्टंप या मोकाट कुत्र्याचे संगोपण या विषयावर काम करतात. त्यांनी हजारो मोकाट कुत्री संभाळून चांगल्या ठिकाणी दिली आहेत. या कुत्र्यांना सांभाळण्यासाठी व त्या विषयी जागृती या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.



9.3 ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानगर, बारामतीच्या वतीने यावर्षी पासून कृषी क्षेत्रामध्ये प्रगतशील, प्रयोगशील व नाविन्यपूर्ण काम करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पद्मश्री डॉ. अप्पासाहेब पवार ॲग्रीकल्चरल ॲवार्ड सुरू करण्यात आलेला आहे. दि. 28. 10. 2016 रोजी प्रथम पद्मश्री डॉ. अप्पासाहेब पवार ॲग्रीकल्चरल ॲवार्ड सोहळा संस्थेच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष मा. शरद पवार यांच्या उपस्थित पार पडला. राज्यातील तीन शेतकऱ्यांना दरवर्षी या पुरस्काराने सन्मानित करण्याात आले. यामध्ये नाशिक मधील सह्याद्री फार्मर्स प्रोड्यूसर्स कंपनीचे अध्यक्ष मा. विलास शिंदे यांना पद्मश्री डॉ. अप्पासाहेब पवार प्रगतशील शेतकरी पुरस्कार, सोलापूर जिल्हातील मंगळवेढा तालुक्यातील शेती क्रांती फार्मर्स क्लबचे अध्यक्ष अंकुश पडवळे यांना पद्मश्री अप्पासाहेब पवार प्रयोगशील शेतकरी पुरस्कार व नाशिक जिल्ह्यातील सौ. विमल आचारी यांना प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात आला.



9.4 ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानग, बारामती संचलित शारदाबाई पवार महिला महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी कल्याणमंडळाच्यावतीने तरूणाईच्या हृदयातील धग जाणून घेऊन स्व चा शोध घेण्याची तळमळ असणाऱ्या युवतींसाठी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व उद्योग अशा वेगवेगळया क्षेत्राची ओळख व्हावी व या क्षेत्रात बदल घडावा, मुलींमधील नेतृत्व घडावे या उद्देशाने सहाव्या स्वयंसिद्धा युवती संमेलनाचे आयोजन शारदानगर येथे करण्यात आले आहे. या संमेलनाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे फोटोग्राफर मा. विक्री रॉय, दिल्ली यांच्या हस्ते संस्थेच्या विश्वस्त मा. सुनंदा पवार यांच्या उपस्थितीत रविवार दि. 18 डिसेंबर रोजी दिनकर सभागृहामध्ये पार पडले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना मा. विक्री रॉय यांनी सांगितले की माझी सुरूवात फोटोग्राफीच्या एका अभ्यासक्रमाने झाली आणि मी अनेक घरांचे फोटो काढले साध्या घरात राहणाऱ्या आईला मी मोठे घर भेट दिले. रेल्वे फूटपाथ दिल्ली ते व्हाईट हाऊस अमेरिका हा प्रवास त्यांनी संमेलनातील युवतींपुढे मांडला. घरची गरिबी, कठोर मेहनत, शिक्षणासाठी आजी–आजोबांकडे रवानगी तेथे अवहेलना वाटयाला आल्यानंतर ते पळून आले प्लॅटफॉर्मवर राहून कष्टाचे काम, वेटर म्हणून काम आणि सलाम बालक ट्रस्ट मध्ये सहावी ते दहावीपर्यंत शिक्षण आणि दहावीत 48 टक्के मार्क्स मिळाल्यामुळें फोटोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण करून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव नेले हा त्यांचा प्रवास ऐकताना उपस्थितांची मने हेलावली. मा. सुनंदा पवार यांनी या युवती संमेलनाचा हेतू स्पष्ट करताना सांगितले की प्रत्येक क्षणी आपल्या हातून काहीतरी चांगले घडावे व युवतींच्या आयुष्याला योग्य दिशा
व मार्गदर्शन मिळावे या हेतूने या संमेलनाचे आयोजन केले आहे.

9.5 ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती संचलित शारदा महिला संघ व ग्रामीण पोलीस बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'महिलांसाठीचे कायदे व पोलीस ॲप' या कार्यक्रमाचे बचत गटातील महिला, महाविद्यालयीन विद्यार्थिनी व महिला कर्मचारी यांच्यासाठी दि. 23. 6. 2016 रोजी संस्थेच्या दिनकर सभागृहामध्ये जनजागृती शिबीर घेण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात पोलीस अधिकारी मा. तानाजीराव चिखले, चंद्रकांत कांबळे व वर्षा जगदाळे यांनी आपल्या मनोगतामधून महिलांविषयक विविध कायदे सविस्तर स्पष्ट केले. याशिवाय शालेय स्तरावर दक्षता साहित्य, चुप्पी तोड, प्रतिसाद ॲप, छुप्या कॅमेऱ्याची जाणीव, स्वतःच्या पायावर उभे राहणे, तात्पुरता मोह टाळणे इ. बाबींवर त्यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी संस्थेच्या विश्वस्त मा. सुनंदा पवार उपस्थित होत्या.



## परिशिष्टे





बारामती कृषी महाविद्यालयाचे ७ जण वनपरिक्षेत्र अधिकारी

*संदर्भसूची : –*

ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानग, बारामती :एक ऐतिहासिक आढावा

1. शारदीय – ''वार्षिकी''
2. ''संस्थेचे वार्षिक अंदाजपत्रक''
3. ''वेबसाइट''
4. ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, शारदानग, बारामती वार्षिक प्रशासकीय अहवाल 2010–11, 2011–12, 2012–13, 2013–14, 2014–15, 2015–16.

www.agriculturaldevelopmenttrust.com

www.adt.in

www.facebook/agricuturaldevelopmenttrust.in

www.kvkbaramati.in

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.www.oldgrt.lbp.world